

संत शिरोमणी
रविदास महाराज

मन चंगा तो कठोती में गंगा !

संपादकीय सल्लागार : मा. पंढरीनाथ पवार

ई–मासिक

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मुखपत्र

# अधिकृत RCM



आशिर्वाद

मा.श्री.बबनराव (नाना) घोलप
माजी समाजकल्याण मंत्री, महाराष्ट्र

adhikrutrcm@gmail.com ▶ वर्ष : १, अंक : २, ऑक्टोबर २०२०, पाने : ४ ▶ संपादक : डॉ. शांताराम पां. कारंडे


|| ब्राह्मण मत पूजिए जो होवे गुणहीन, पूजिए चरण चंडाल के जो होने गुण प्रवीन ||

निव्वळ पद मोठे म्हणून कोणाची पूजा करु नका, पदाची पूजा नको तर व्यक्तीच्या अंगभूत गुणांची पूजा करा मग तो मोठ्या पदावर नसला तर काय झाले.





# महासंघाचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांच्या हस्ते अधिकृत वेब साईट आणि ई-मासिकाचे विमोचन

**नाशिक (प्रतिनिधी) :**

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष, माजी समाजकल्याण मंत्री, क्रांतिकारी नेते, चर्मकार हृदय सम्राट मा. श्री. बबनराव (नाना) घोलप साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरूवार दि. २४ सप्टेंबर २०२० रोजी सायं. ५ वा. राज्यस्तरीय आनलाईन २६ वा वर्धापनदिन सोहळा पार पडला.

सदर ऑनलाइन संमेलनाला बरोबर ५ वा. सुरुवात होऊन अत्यंत शिस्तीत प्रत्येकाने आपापले मत अगदी थोडक्यात मांडले. सर्वप्रथम संघटनेच्या वतीने वर्धापन दिनानिमित्त आदरणीय नानांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर कार्यक्रमाची रूपरेषा प्रस्तावनेच्या माध्यमातून राज्य सचिव श्री. दत्तात्रेय गोतिसे यांनी केली. त्यानंतर चर्मकार समाजातील विविध गुणवंत विद्यार्थ्यांचा मा. बबनराव घोलप यांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला.

सदर संमेलन शिस्तीने पार पडेल याची काळजी प्रत्येकाने आवर्जून घेतली. आदरणीय नानांनी आखलेल्या रुपरेषेबाहेर कुणीही न जाता राष्ट्रीय चर्मकार महासंघाने शिस्तीचा एक नवा इतिहास रचला. त्यावेळी अत्यंत उत्साहाच्या



वातावरणात www.rcmbg.org या देशातील पहिल्या चर्मकार संघटनेच्या वेबसाईटचे उदघाटन व राष्ट्रीय चर्मकार

पान 3 वर

## संपादकिय

### मी बबन घोलप बोलतोय!

**माझे चर्मकार बंधू भगिनींनो,**

आज मी आपल्या समोर संकुचित नव्हे तर विशाल दूरदृष्टीने बोलतोय,आपण मला १० ऑक्टोबरला माझे वाढदिवसाच्या निमित्ताने हार्दिक शुभेच्छा दिल्या पण त्या स्विकारण्यात मला जराही स्वारस्य वाटले नाही. कारण मी उद्विग्न अवस्थेत आहे. वर्तमानपत्र व काही दुरदर्शन वृत्तवाहिन्यावरील बातम्या पाहिल्यावर आपला समाजच नाही तर सर्व दलित समाज आणि महिला वर्ग सुरक्षित राहिलेला नाही असे चित्र आता मला स्पष्ट दिसू लागले आहे. त्यामुळे मी अतिशय अस्वस्थ झालो आहे. महाराष्ट्रात देखील मागील सहा महिन्यात फक्त आपल्या समाजातील जे सहा- सात अत्याचार, मारहाणीच्या व जिवे मारण्याचा घटना घडल्या ते पाहता आतां आपण सजग व जागृत झाले पाहिजे. गावखेड्यातील अल्प प्रमाणात जो आपला समाजच नव्हे तर सर्वच बहुजन समाजात आपण जागृती करून, आपण नेतृत्व केले पाहिजे असे मी आज संघटनेत काम करीत असलेल्या आपल्या सर्व पदाधिकारी यांना आवाहन करीत आहे. हे सर्व करत असतांना आपल्या समाजातील इतर ज्या संघटना आहेत त्यांचे बरोबर आपले मतभेद असू दे, पण आपण मनभेद होऊ देऊन नका.

आता आपण सर्व मिळून संघटीत झालेच पाहिजे अन्यथा पुढची पिढी आपणास माफ करणार नाही हे आता आपण ओळखलेच पाहिजे. आज चर्मकार समाजाला पुरोगामी विचारसरणीची गरज आहे, समाजाला छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, माता जिजाई, माता रमाई, माता सावित्रीबाई फुले यांचे विचार व कार्य समजावून सांगितले पाहिजे. महिला सक्षम केल्या पाहिजेत. आपण सर्व एकसंघ राहून शिक्षण घेतलेच पाहिजे. आज आपण हाथरस घटना नजरेआड करून चालणार नाही. या प्रकारे जर दलित समाजाची दयनीय अवस्था होत असेल तर आपणही आपली जात बाजूला ठेवून अशा अमानवी घटनेचा फक्त निवेदने देऊन शांत न बसता वेळप्रसंगी रस्त्यावर उतरले पाहिजे. आपली एकसंघ ताकद आता दाखवलीच पाहिजे. आपल्या देशात एक वेगळी मनोवृत्ती तयार होत असून ती संविधान जाळू पहात असून चतुर्वणाला पुन्हा लागु करू पहात आहे. या सूप्तशक्तीला आपण वेळीच विरोध केला नाही, आवर घातला नाही तर आपल्या पुढील पिढ्या याचा बळी ठरू शकतील, हे आता आपण ओळखले पाहिजे. काळ बदलत चालला आहे, सरकारी नोकऱ्या संपत आल्या आहेत. पिढीजात व्यवसाय दुसऱ्यांच्या हाती गेले आहेत. सरकारी कंपन्यांचे खाजगीकरण आता जोर धरू पहात आहे. म्हणून आता शिक्षण घेऊन व्यवसायिक शिक्षणाची कास धरून छोटे मोठे व्यवसाय सुरू केले पाहिजेत.

समाजातील राजकारणी आपल्या पक्षात मोठे पदावर गेले तरी समाजाला मदत करीत नाहीत, आणि जो समाज राजकारण करून मोठ्या पदावर जात नाही तो पर्यंत तो समाजाला काही देऊ शकत नाही हेही तितकेच खरे आहे. म्हणून आता आपण सामाजिक दृष्टीकोन समोर ठेऊन स्थानिक राजकारण्याला संघटीत समाजाचा दबाव आणून आपल्या समाजाचा सर्वांगीण विकास साधता आला पाहिजे. पण हे सर्व करत असतांना आपले राजकीय जोडे हे समाजासमोर येतांना काढून ठेवले पाहिजे हे आपण विसरता कामा नये. आता मी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वेगवेगळ्या विभागाच्या कॅबिनेट कमिटी तयार करून आपणाला स्वतंत्र अधिकार दिले आहे. त्यामुळे कामाला गती मिळून समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचणे सहज शक्य होईल. या साठी आता आपण खऱ्या अर्थाने कामाला लागले पाहिजे.


**पंढरीनाथ पवार**
राष्ट्रीय सल्लागार
राष्ट्रीय चर्मकार महासंघ

■ 98202 58049



बबनराव घोलप अर्थात सर्वांचे लाडके नाना हे जरी आज समाजकारणात व्यस्त असले तरी त्यांनी राजकारणात असताना मारलेली मोठी भरारी महाराष्ट्राच्या कायम लक्षात राहण्यासारखी आहे.एक दोन नव्हे तर तब्बल पाच वेळा विधानसभा जिंकलेली व्यक्ती म्हणजे नाना !

# एकमेवाद्वितीय...नानासाहेब!



**राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. बबनराव घोलप अर्थात सर्वांचे लाडके नाना हे जरी आज राजकारणात व समाजकारणात व्यस्त असले तरी त्यांच्यात एक हरहुन्नरी कलाकार आहे. ते स्वतः कलावंत आहेत हे अनेकांना माहिती नसेल. मात्र त्यांनी युवा असतानाच अनेक नाटकांमध्ये, नाट्य कार्यक्रमांमध्ये लोक कलावंत म्हणून विविध भूमिका साकारल्या आहेत.**

एक अस्सल कलावंत म्हणून नानांनी वेगवेगळ्या भूमिका स्वतः साकारल्या असून कितीतरी चित्रपट व नाटकांची निर्मिती त्यांनी केलेली आहे. निलंबरी, शेगविचा राणा गजानन , अत्तराचा फाया, जय वैभव लक्ष्मी माता, वंशवेल, मेरी मर्जी, अष्टभुजा सप्तशृंगी माता, संसार माझा सोन्याचा, नागराज तुझा भाऊराया, बापमाणुस, विडा एक संघर्ष, घरंदाज व सुहासिनी या व अशा अनेक चित्रपटांची निर्मिती व सोबत त्यामध्ये अभिनय सुद्धा केला आहे. तसेच शाहू महाराजांवरील दूरदर्शन मालिका असे कितीतरी वग, नाटक व लावण्यांचा कार्यक्रम त्यांनी व्यासपीठावर गाजवला आहे.

नुकताच त्यांचा सत्य साईबाबांच्या जीवनावरील महत्वाकांक्षी चित्रपट रिलीज होण्याच्या तयारीत असून त्यामध्ये सुद्धा एका मोठ्या पोलीस अधिकाऱ्याची दमदार भूमिका त्यांनी साकारलेली आहे. त्या भूमिकेचं वैशिष्ट्य असे की, ती भूमिका साकारताना हिंदी फिल्म इंडस्ट्रीचे मोठे कलाकार जॅकी श्रॉफ यांच्या सोबतचे त्यांचे सीन दमदार असे वाटले. मुरलेल्या कलाकारासमोर अगदी सहजतेने वावरून नानांनी ते अभिनयात किती मातब्बर आहेत हेच सिद्ध केले.

सुरुवातीला पोटापाण्याचा भाग म्हणून अनेक ठिकाणी लोककलावंत म्हणून काम करीत असताना कुठेही अन्याय दिसला की लाथ मारण्याचा स्वभाव असल्याने साहजिकच सामाजिक जाणिव जिवंत असल्याचे लक्षण होते. नानांचा मूळ पिंड हा समाजसेवेचा असल्याने संघर्ष, अन्यायाविरुद्ध बंड हे ठरलेलेच !

अगदी लहानपणापासून गरिबीचे चटके खाल्ल्याने, सामाजिक झळ पचविल्याने व जगण्यासाठी संघर्ष केल्याने एका छोट्याश्या गावचे बबन हळू हळू बबनराव झाले. आणि समाजाची निस्सीम सेवा करत एके दिवशी सर्वांचेच प्रेमळ, लाडके नाना झाले. नानांच्या समाजसेवेमुळेच प्रभावित होऊन महाराष्ट्राचा वाघ असलेले मा. बाळासाहेब ठाकरे यांनी स्वतःहून पत्र पाठवून त्यांना विधानसभेची उमेदवारी देऊ केली. लोकांची सेवा करण्याची एक मोठी संधी त्यांनी राजकारणाच्या माध्यमातून नानांना दिली. आणि नानांनी देखील त्या संधीचं सोनं केलं.

शिवसेना पक्ष सत्तेत आल्यानंतर मा. श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी नानांना समाजकल्याण मंत्री बनवून आपल्या समाजाची सेवा करण्याची जी संधी दिली त्या संधीचा उपयोग करत नानांनी सर्वप्रथम विखुरलेला आपला समाज एकत्र केला. सत्तेत असणारा कुणीही नेता ठराविक एका समाजाची मोट बांधत नसतो, कारण त्याला पुढची निवडणूक लढवायची आणि जिंकायची असते. परंतु नानांनी याच गोष्टीला फाटा देत प्रथम आपला चर्मकार समाज एकत्र केला. ही गोष्ट नाकारून चालणार नाही. कारण अशा गोष्टीला धाडस लागतं.

नामदार बबनराव उर्फ नानासाहेब घोलप या धडाकेबाज समाजकल्याण मंत्री असलेल्या चर्मकार नेत्याने एका झटक्यात समाज गोळा केला. छोट्या - मोठ्या २०० संघटना विसर्जित करून महाराष्ट्रीय चर्मकार संघाची स्थापना केली आणि अख्खा महाराष्ट्र ढवळून काढला. पुढे याच संघटनेचा विस्तार करीत देशपातळीवर नेऊन राष्ट्रीय चर्मकार महासंघाची गुढी रोवली. आज या संघटनेचे देशपातळीवर हजारो पदाधिकारी व लाखो कार्यकर्ते आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक खेडोपाडी पोहोचलेली संघटना म्हणून आजही लौकिक आहे.

बबनराव घोलप अर्थात सर्वांचे लाडके नाना हे जरी आज समाजकारणात व्यस्त असले तरी त्यांनी राजकारणात असताना मारलेली मोठी भरारी महाराष्ट्राच्या कायम लक्षात राहण्यासारखी आहे.एक दोन नव्हे तर तब्बल पाच वेळा विधानसभा जिंकलेली व्यक्ती म्हणजे नाना ! पहिल्या विधानसभेतच डायरेक्ट मंत्री म्हणून गळ्यात माळ पडलेल्या भाग्यवंतांपैकी एक म्हणजे नाना! मंत्री म्हणून महाराष्ट्रभर दौरा करून आपला समाज एकत्र करणारा एकमेव नेता म्हणजेच नाना!

महाराष्ट्राची महत्वाची खाती अर्थात महिला व बालकल्याण, समाजकल्याण व माजी सैनिकांचे कल्याण अशा खात्यांचा मंत्री म्हणून नानांनी जगात पाहिले महिलांसाठी ३३% आरक्षण देऊन स्वतंत्र बजेट मांडले. चीन या देशाच्या बीजिंग येथे अर्थसंकल्प मांडणारे जगातील पहिले मंत्री ठरले. खत्री आयोगाची स्थापना, भटक्या जमातीची अ, ब, क, ड अशी विभागणी करून त्यांना आरक्षणाचा लाभ मिळवून देणारे पहिले मंत्री ठरले. कास्ट व्हॅलिडीटी चे जनक हे नानाच आहेत. याचबरोबर समाजाला शासनाच्या माध्यमातून ३५० आश्रम शाळा, ३०० वसतिगृहे, ६ सूतगिरण्या व ४०० वृद्धाश्रम हे नानांनी दिले.

इतकं अवाढव्य सामाजिक भरीव काम करून पण नाना अजूनही समाजाची सेवा करण्यात स्वतःला धन्य समजतात. नाना एकमेव असे नेते आहेत जे पराकोटीच्या उंचीला पोहोचून पण त्यांची नाळ समाजाशी जोडलेली आहे. त्यांचे हात गगनाला भिडलेले असतांना पण त्यांचे पाय जमिनीवर आहेत. काही मंडळींनी ठरवून त्यांच्या सोबत गद्दारी केली पण मनाचा राजा असणाऱ्या नानांचं राजसारखाच मोठं मन आहे. थोडक्यात नाना हे एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्त्व आहे असे म्हटल्यास वावगं ठरणार नाही.

■ **डॉ.शांताराम कारंडे - ९८२०१५८८८५**
■ dr.shantaramkarande@gmail.com

**संपादक मंडळ**

■ **पंढरीनाथ पवार** संपादकीय सल्लागार ■ **डॉ.शांताराम कारंडे** संपादक ■ **जयवंत बामणे** कार्यकारी संपादक
■ **सहसंपादक :** रविंद्र राजुस्कर, दत्तात्रय गोतिसे, रोहीदास बनसोडे, डॉ गणेश बोरकर, मारुती शिवदास
■ **उपसंपादक :** श्रीमती सरोज बिसुरे, पांडुरंग बाविस्कर, ज्ञानेश्वर बसेशंकर,

हे ई-मासिक वृत्तपत्र राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने मुद्रक, संपादक डॉ.शांताराम कारंडे यांनी प्रकाशक मे. सिध्दांत प्रकाशनातर्फे २२१/६, गीतगुंजन, सेक्टर-२, चारकोप, कांदिवली (प), मुंबई- ६७ येथून डिजिटली प्रकाशित केले. संपादकीय सल्लागार : पंढरीनाथ पवार email : adhikrutrcm@gmail.com (अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या आणि लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही)


■ पान १ वरुन... **महासंघाच्या वेबसाईट आणि ई-मासिकाचे प्रकाशन**

महासंघाचे मुखपत्र ई- मासिक अधिकृत RCM चे प्रकाशन माजी समाजकल्याणमंत्री, क्रांतिकारी नेते, चर्मकारहृदय सम्राट मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांची भाषणे झाली.

आदरणीय नानांनी पदाधिकाऱ्यांना उद्देशून केलेल्या भाषणात राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या विविध विभागाच्या मांडणीबाबत व त्याअनुषंगाने समाजात कशा प्रकारे काम केले पाहिजे ते सांगितले. वेबसाईटच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने आपली संघटना आता घरा घरात पोहोचली असल्याचा आनंद व्यक्त केला.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाची शिस्त पाळत हे ऑनलाइन संमेलन व वेबसाईटचे उद्घाटन यशस्वी करण्यासाठी आयोजक प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. शांताराम कारंडे, प्रदेश सचिव श्री. दत्तात्रेय गोतिसे यांनी विशेष मेहनत घेतली.

या अधिवेशनाला राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व अध्यक्ष मा. श्री. बबनराव (नाना) घोलप , माजी समाज कल्याण मंत्री यांच्यासाहित पंढरीनाथ पवार-राष्ट्रीय सल्लागार, भानुदास विसावे-राष्ट्रीय कार्याध्यक्ष, ज्ञानेश्वर कांबळे-राष्ट्रीय महासचिव, बाबूराव नेरकर-राष्ट्रीय उपाध्यक्ष, हरिश पाचकोरे-राष्ट्रीय उपाध्यक्ष, प्रा. शशिकांत सोनवणे-राष्ट्रीय उपाध्यक्ष, रविंद्र राजूस्कर-राष्ट्रीय प्रवक्ता, उमाकांत डोईफोडे-राष्ट्रीय सचिव, नंदिनी सौंदनकर-राष्ट्रीय महिला अध्यक्षा, सरोज बिसुरे-राष्ट्रीय म.सचिव, सूर्यकांत गवळी -राष्ट्रीय उपाध्यक्ष, ॲड. आनंद गवळी-राष्ट्रीय उपाध्यक्ष, सुदाम लोखंडे-राष्ट्रीय उपाध्यक्ष, माधवराव गायकवाड-प्रदेशाध्यक्ष, डॉ. शांताराम कारंडे -प्रदेश कार्याध्यक्ष, संगीता खोदाना -प्रदेश उपाध्यक्षा, दत्तात्रेय गोतिशे -प्रदेश सचिव, राजाभाऊ जाधव - राज्य उपाध्यक्ष, दिलीप



कानडे-उत्तर प्रदेश अध्यक्ष, गोपालसिंह बच्छेरे-मराठवाडा अध्यक्ष, भिवसेन आहिरे -कार्यकारिणी सदस्य, गजानन भटकर-विदर्भ प्रमुख, अंबादास गवळी-राज्य उपाध्यक्ष, संजयबाबा शिंदे -प. महाराष्ट्र अध्यक्ष, प्रा. डी. आर. माळी -प. विदर्भ अध्यक्ष, दिपा भोईर - घोलप-उ. महाराष्ट्र अध्यक्षा, शोभा कानडे-राज्य कार्यकारणी सदस्य, सौ. मीना भागवतकर, सौ. सोनाली माने, सौ. अंजली विसावे, रोहिदास बनसोडे-प्रदेश प्रवक्ते, जयश्री विसावे-राज्य उपाध्यक्षा महिला, बाबूराव नेरकर-राज्य उपाध्यक्ष, गौतम बळवंते -कोकण सचिव, राजेश खाडे-मुंबई विभागीय अध्यक्ष, राजू नेटके-मुंबई अध्यक्ष, तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्ष, सचिव व इतर पदाधिकारी मिळून दोनशे ते अडीचशे जण उपस्थित होते. चर्मकार समाजाच्या उन्नतीसाठी व सहकार्यासाठी सर्वप्रथम बनवलेल्या www. rcmbg.org या वेबसाईटचे ऑनलाइन उद्घाटन अत्यंत यशस्वीपणे पार पडले. ही वेबसाईट बनविण्यासाठी आदरणीय नानांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. शांताराम कारंडे, दत्तात्रेय गोतिसे, मनोज पवार, प्रमोद पवार व चंद्रकांत खेडेकर यांनी अहोरात्र मेहनत घेतली.



## आमचा बबनराव!

उध्दरण्या कोटी कुळे जैसा जन्मला भीमराव,
तैसा आम्हां उध्दरण्या
अवतरला आमचा बबनराव...
प्रेमादरे संबोधितो त्यांसी आम्ही नाना,
चौसष्ठ विद्या, चौदा कला अंतरीच्या नाना...
झिजवला देह त्याने समाजकारणे उभा,
कष्टांचिया तयाच्या न लागे कुणासही ठाव
ऐसा आम्हां उध्दरण्या
अवतरला आमचा बबनराव...

-विलास माने, विरार

हाथरस बलात्कार प्रकरण ■ राष्ट्रीय चर्मकार महासंघाची मागणी ■ जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने राज्यभरात निवेदने सादर

## दोषींना त्वरित फाशी द्या!

**विशेष प्रतिनिधी) :**

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक/ राष्ट्रीय अध्यक्ष, माजी समाजकल्याण मंत्री, चर्मकार हृदयसम्राट, क्रांतिकारी नेते मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांच्या आदेशाने व प्रदेश अध्यक्ष श्री. माधवराव गायकवाड, प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. शांताराम कारंडे व राज्य सचिव श्री. दत्तात्रेय गोतिसे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील सर्व जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना निवेदने देण्यात आली. उत्तर प्रदेश येथील हाथरस जिल्ह्यात दलित महिला मनीषा वाल्मिकी हिच्यावर बलात्कार करून अमानुष अत्याचार करणाऱ्या आरोपींना त्वरित कठोर शासन करणेबाबतचे निवेदन देण्यात आले.

सदर निवेदने गुरूवार दि. १ ऑक्टोबर २०२० रोजी सकाळी ११.३० वा. एकाच वेळी प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात आली. या निवेदनाद्वारे शासनातर्फे मा. पंतप्रधान व मा. राष्ट्रपती यांना कळवले की, उत्तर प्रदेश मधील हाथरस जिल्ह्यातील एका खेडेगावात मनीषा वाल्मिकी नावाच्या दलित परिवारातील मुलीवर उच्च जातीतील काही गुंड प्रवृत्तीच्या युवकांनी अमानुष बलात्कार केला. ते गावगुंड फक्त बलात्कार करून शांत बसले नाहीत तर उलट तिच्या हातापायाची हाडे तोडली, जीभ कापली व गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. आज ती हयात नसली तरी तिने मृत्यूआधी पोलिसांना दिलेल्या जबानीत सर्व काही कथन केले.

त्यानंतर पोलिसांनी ताबडतोब त्या गुंड प्रवृत्तीच्या युवकांना अटक केली. दलित परिवारातील कुमारी मनीषा वाल्मिकी फक्त १९ वर्षे वयाची होती. ती आपल्या शेतात गुरांना चारा देण्यासाठी जात असताना तिच्या पाळतीवर असलेल्या उच्च जातीतील गुंडांनी कायद्याची भीती न बाळगता हे दुष्कृत्य केले. असल्या नीच व गुंड प्रवृत्तीच्या नराधमांवर कायद्याने फास्ट ट्रॅक न्यायालयात दावा दाखल करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.





मुंबई





नाशिक



नागपूर









सोलापूर



वाशिम



## नानासाहेबांचा वाढदिवस

# एक आनंदोत्सव...!

**राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष, माजी समाजकल्याणमंत्री, चर्मकारहृदयसम्राट मा. श्री. बबनराव घोलप यांचा ६७ वा वाढदिवस येत्या शनिवारी दिनांक १०/१०/२०२० रोजी आहे.**

क्रांतीकारी नेते आदरणीय बबनरावजी घोलप हे महाराष्ट्राचे माजी समाज कल्याणमंत्री असताना त्यांनी फक्त मंत्रिपदाची सुखं उपभोगायची सोडून अख्खा महाराष्ट्र पालथा घातला. त्यांनी समस्त महाराष्ट्रातील चर्मकार समाजाला एकत्र करून २४ सप्टेंबर १९९५ रोजी महाराष्ट्रीय चर्मकार संघाची स्थापना केली. पुढे त्या संघटनेचे स्वरूप वाढून राष्ट्रीय चर्मकार महासंघात रूपांतर झाले. संघटना देशभर वाढली व समाजाचा सामाजिक, आर्थीक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात असा सर्वांगीण विकास केला. चर्मकार समाजाला खऱ्या अर्थाने न्याय मिळवून दिला.

छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले,राजमाता जिजाबाई, सावित्री बाई, संत हरळया, संत कक्कया, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बाबू जगजीवनराम व मा. कांशीराम यांच्या विचारांनी प्रेरीत होऊन महाराष्ट्रात व देशात चर्मकार समाजाला संघटित करून समाज जागृत केला. समजावता न्याय हक्कासाठी व उद्धारासाठी फक्त एकमेव नेता म्हणजे आपले नानासाहेब घोलप!

राष्ट्रीय नेते मान. बबनरावजी घोलप अर्थात नानासाहेब यांचा वाढदिवस हा दरवर्षी आपण सर्वजण एकत्र येऊन नाशिक येथे मोठ्या उत्साहात साजरा करत असतो. प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष व इतर पदाधिकारी आपापल्या भागात विविध कार्यक्रमाचे आयोजन करून आनंदोत्सव साजरा करतात. इथे असे करावे असे कुणीही सांगत नसून प्रत्येक पदाधिकारी आपापल्या इच्छेने वेगवेगळे सामाजिक उपक्रमाचे कार्यक्रम राबवून नानांविषयी असलेल्या प्रेमाचे आनंदात रूपांतर करतात. परंतु यावर्षी कोरोना या महामारीमुळे व कलम १४४ लागू असल्याने आपण नाशिक येथे एकत्र येऊन हा कार्यक्रम करू शकत नाही. संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. शांताराम कारंडे यांनी झूम ऍपद्वारे शुक्रवार दि. ९ ऑक्टोबर २०२० रोजी ऑनलाइन संमेलन आयोजित करून आपल्याला एक चांगली संधी उपलब्ध करून दिली आहे.

तसेच ऑनलाइन नानांना शुभेच्छा दिल्यानंतर नानांच्या वाढदिवसानिमित्त आपण आहे तेथेच विविध कार्यक्रम आखून उदा. जिल्हात समाजातील गरजू बांधवांना अन्नधान्याचे वाटप, रूग्णांना फळवाटप, जिल्ह्यातील सामाजिक वरिष्ठ बांधवांचे सत्कार, समाजातील गुणवंत विद्यार्थी सत्कार तसेच सर्व ठिकाणी नानासाहेबांच्या वाढदिवसाचे बॅनर तयार करून लावण्यात यावेत. हे सर्व करत असतांना शासनाने व पोलीस प्रशासनाने आखून दिलेल्या सूचनांचे पालन करून वाढदिवस आनंदात व शांततेत साजरा करावा. त्यामुळे आपल्या समाजात जागृती निर्माण होईल. संत रविदास महाराज व नानासाहेबांच्या विचारांचा प्रसार व प्रचार केल्याने येणाऱ्या उद्याच्या पिढीला आदर्श निर्माण होईल. समस्त चर्मकार समाजासाठी आयुष्यभर योगदान देणारे महाराष्ट्रासह देशातील एकमेव नेतृत्व म्हणजे चर्मकार हृदयसम्राट मा. श्री. बबनराव (नाना) घोलप साहेब. कारण आपल्या नानासाहेबांचा वाढदिवस हा आपल्या सर्वांसाठी एक आनंदोत्सव आहे.

लेखक :
**दत्तात्रेय गोतिशे,**
प्रदेश सचिव
राष्ट्रीय चर्मकार महासंघ
मोबा. क्र. : ७७२२०७९१२५

## नाना वाढदिवस विशेषांक!


राजकारणात ५० वर्षे; समाजकारणातही ५० वर्षे... नेता, अभिनेता... अभिनेते-निर्माते या भूमिकेत कला-नाट्य क्षेत्रात ५० वर्षांचा यशस्वी वावर...

**नाना**

महाराष्ट्र राज्याच्या समाजकल्याण खात्याच्या स्वतंत्र अर्थसंकल्पाची सुरुवात करुन स्वत: मंत्री असताना अंमलात देखील आणली...

१११९ जोडप्यांचा विवाह एकाच वेळी एकाच मंडपात लावून 'गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये नोंद...

नासिक येतील कुंभमेळ्यात त्रिदेव याग यज्ञाचे आयोजन लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस मध्ये नोंद...




मंत्रीपदाच्या कार्यकाळात महिलांना ३३% आरक्षण देत बिजिंग-चीन येथे अर्थसंकल्प सादर...

मंत्रीपदाच्या कार्यकाळात चर्मकार समाजासाठी ३५ वृध्दाश्रम, ६० वसतिगृहे, ३८ आश्रमशाळा, ६ सूतगिरण्या प्रदान

स्त्री आयोगाची स्थापना व भटक्या विमुक्त जमातीची अ, ब, क, ड अशी विभागणी करुन जनगणना सुरु केली.

'लिडकॉम' या शासनाच्या महामंडळाचे **'संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळ'** असे नामांतर करुन त्याचे भागभांडवल वाढवून त्याचा विस्तार करत विशेष अधिकार प्राप्त करुन देणारा क्रांतिकारी निर्णय घेतला.

चर्मकार समाज एकत्र आणून **राष्ट्रीय चर्मकार महासंघ** या सामाजिक संघटनेची स्थापना केली.




## डॉ. शांताराम कारंडे यांची महाराष्ट्र राज्य ग्राहक प्रबोधन समिती राज्य सरचिटणीस पदी निवड



**मुंबई (प्रतिनिधी) :** चारकोप येथील प्रसिद्ध कवी, लेखक, पत्रकार, संपादक, समाजसेवक व जेष्ठ साहित्यिक तसेच राजकीय व सामाजिक अश्या अनेक विविध क्षेत्रात काम करणारे, पदाला न्याय देऊन त्या पदाची उंची वाढविणारे आणि तन, मन, धन लाऊन काम करणारे डॉ. शांताराम कारंडे यांची ग्राहक प्रबोधन समिती, महाराष्ट्र राज्य (रजि.) मध्ये महाराष्ट्र राज्य सरचिटणीस पदी निवड झाली.

डॉ. कारंडे यांच्याकडे अनेक महत्वाच्या जबाबदाऱ्या असून एकूण ६५ विविध संघटनांवर ते कार्यरत आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी असलेले डॉ. कारंडे व्यवसायाने स्वतः आर्किटेक्ट व बिल्डर आहेत. अनेकांच्या मदतीला धावून जाणे त्यांच्या स्वभावात असल्याने अनेक संघटनांचे ते सक्रिय सभासददेखील आहेत. नुकतेच त्यांनी लॉक डाऊन मध्ये आलेल्या वाढीव विजबिलांबद्दल टीव्ही ९ वर आवाज उठवला होता. या आणि अशाच ऍक्टिव्हिटी पाहून ग्राहक प्रबोधन समितीचे संस्थापक व अध्यक्ष श्री. सुहास सिद यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्यावर ही महत्वाची जबाबदारी सोपवली.